ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १९ ऑक्टोबर, १९५५ | अंक ४३

## विविध माहिती

**पाकिस्तानचा कागदाचा कारखाना**—पूर्व पाकिस्तानांत खुलना ह्या ठिकाणीं पाकिस्तान सरकार कागद तयार करण्याचा कारखाना लवकरच उभारणार आहे. कारखान्यासाठी २० कोटी रुपये भांडवल लागणार असून कांहीं प्रमाणांत परकीय तज्ज्ञांची तांत्रिक मदतहि घेण्यांत येणार आहे.

**अणु-संशोधनांत सहकार्य**—अमेरिकेच्या संरक्षण खात्यानें असें जाहीर केलें आहे कीं अणुशक्तिविषयक गौप्यांच्या देवाण-घेवाणीसाठी अमेरिकनें कॅनडा व ब्रिटन ह्या दोन देशांबरोबर स्वतंत्र करार केले आहेत. अणुशक्तिविषयक संशोधनास ह्या करारांमुळें मदत होणार आहे. तथापि, अणुशक्ति वापरणारीं आयुधें मात्र ह्या करारांतून वगळण्यांत आलीं आहेत.

**पूरपीडितांच्या मदतीसाठी**—ब्रिटनचे पंतप्रधान मि॰ ॲंथनी ईडन ह्यांनीं पंतप्रधान श्री. नेहरू ह्यांच्याकडे एक संदेश धाडून भारतामधील पूरपीडितांबद्दल सहानुभूति व्यक्त केली आहे. त्याचबरोबर, पाकिस्तान व भारत ह्या देशांतील पूरपीडितांच्या मदतीसाठी ब्रिटिश सरकारनें ५०,००० पौंडांची रक्कम ब्रिटिश रेड क्रॉसच्या हवाली केली आहे.

**प्रवाशांच्या इच्छेला मान**—इंडिअन एअर लाइन्स कॉर्पोरेशनचें एक विमान सांताक्रूझ विमानतळावरून उड्डाण करीत असतां एंजिनें बिघडल्याचें आढळून आलें. वैमानिकानें प्रसंगावधान राखून तें खाली उतरविलें. पण उतरतांना तें उड्डाण करण्याच्या पट्टयापासून बाजूला घसरलें. नंतर विमान तर बदलण्यांत आलेंच, पण प्रवाशांच्या इच्छेला मान देऊन वैमानिकहि बदलण्यांत आला !

**जागतिक बँकेनें दिलेलीं कर्जें**—जागतिक बँकेचे अध्यक्ष मि. युजीन ब्लॅक एका प्रसंगीं भाषण करतांना म्हणाले कीं, जागतिक बँकेनें ३८ देशांना १३० कर्जें दिलीं आहेत. कर्जांची एकूण रक्कम २४० कोटी डॉलर्स भरेल. बँकेनें १०० कोटी डॉलर्सची रक्कम खाजगी व्यक्तींनीं केलेल्या बचतीमधून गोळा केलेली आहे. सध्या ५८ देश ह्या बँकेचे सभासद आहेत.

**अमेरिकेनें देऊं केलेली फेलोशिप**—अमेरिकेनें देऊं केलेल्या आयसेनहोअर एक्सचेंज फेलोशिपमधील एका जागेचा स्वीकार भारतीय सरकारनें केला असून त्यासाठी जिओफिजिकल सोसायटी ऑफ इंडिआ ह्या संस्थेंतील एका अधिकाऱ्याची निवड केली आहे. पेट्रोलच्या खाणी सांपडणारे भूस्तर ह्या विषयाचा विशेष अभ्यास करण्यासाठी ते अमेरिकेला जातील. त्यांच्या शिक्षणांत पेट्रोलच्या खाणी शोधण्याच्या शास्त्राचाहि समावेश आहे.

**पाकिस्तानांतील पुराची कहाणी**—पश्चिम पाकिस्तानांत रावी व सतलज ह्या नद्यांना आलेल्या महापुराच्या तडाख्यानें ९० लाख लोक निराश्रित झाले आहेत, असा अंदाज करण्यांत आला आहे. पुराचें पाणी भावलपूर विभागांतील १० हजार चौरस मैलांवर पसरलें होतें. सुमारें ४०,००० गुरें नाश पावलीं असून ७ कोटी रुपयांच्या मालमत्तेचें नुकसान झालें आहे.

**कॅन्सर आणि सिगारेटचा कागद**—सिगारेटसाठी वापरण्यांत येणारा कागद सावकाश जळावा म्हणून त्यावर अरसेनिकच्या साह्यानें कांहीं संस्कार करण्यांत येतात. सिगारेटस् ओढणाऱ्यांना होणारा कॅन्सर आणि सिगारेटचा कागद ह्यांचा संबंध असावा असें म्हणतात. सिगारेटच्या कारखानदारांनीं ह्याविषयीं संशोधन करावें, अशी सूचना करण्यांत येत आहे.

**सहकारी साखर-कारखाना**— राहुरी तालुका सहकारी साखर कारखान्यानें जरूर त्या यंत्रसामुग्रीची मागणी नोंदविली आहे. कारखान्याचे एकूण भागीदार १३१२ आहेत व त्यांनीं ८ लाख रुपयांचें भांडवल गोळा केलें आहे. इंडियन फिनॅन्स कॉर्पोरेशननें ४३ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. कारखाना पुढील ऑक्टोबर महिन्यांत सुरू होऊन त्यांत रोज १,५०० पोतीं साखर तयार करण्यांत येईल.

**पाणीपुरवठ्यासाठी धरण**—गुजरातमधील सुखी नदीवर धरण बांधण्याच्या योजनेवर मुंबई सरकार विचार करीत आहे. धरणाच्या कामासाठी १ कोटी रुपये खर्च येईल, व त्यापासून मिळणाऱ्या पाण्याखाली २५,००० एकर जमीन भिजेल. धरण ७० फूट उंच आणि सुमारें १०,००० लांब असें होईल.

**ऑस्ट्रिआ-रशिया व्यापारी करार**—ऑस्ट्रिआ व रशिया ह्या देशांनीं परस्परांत तीन व्यापारी करार केले आहेत. एक करार व्यापार व बोटींच्या वहातुकीचा आहे, दुसरा ऐनजिनसी व्यापारासंबंधी आहे आणि तिसरा पैशाच्या देण्याघेण्यासंबंधी आहे उभयतां राष्ट्रांत दरवर्षी २·५ कोटी डॉलर्स किंमतीचा व्यापार करण्यांत येणार आहे.

**इजिप्तमधील नवें धोरण**—इजिप्तमध्यें आस्वान येथें सध्या असलेल्या धरणाची उंची बेताचीच असल्यानें शेतीसाठी पाणी पुरविण्यापुरताच त्याचा उपयोग होतो. नव्या संकल्पित धरणामुळें वीज तर उत्पन्न करतां येईलच, पण पोलादाचा व खताचा कारखानाहि काढतां येईल. धरणाच्या बांधकामाची सामुग्री रशिआ पुरविणार आहे. इजिप्तमधील ‘ गिझा ’ ह्या प्रचंड पिरॅमिडच्या १७ पटीनें अधिक सामुग्री नव्या धरणासाठी लागेल.

**दारू वाहून नेण्यासाठी खास बोट**—हॉलंडमधील एका बोट बांधणाऱ्या कंपनीनें बीर ही प्यावयाची दारू वाहून नेण्यासाठी एक खास बोट बांधली आहे. सुमारें ३०,००० गॅलिन दारू बोटींतून नेतां येईल व ती बोट फक्त नदी प्रवाहांतच वापरतां येईल. दुसऱ्या एका डच कंपनीकडून अशीच एक बोट फ्रान्सनें विकत घेतली होती.

**ओरिसांत नवें एंजिनिअरिंग कॉलेज**—हिराकूद येथें पुढील वर्षापासून खरगपूर टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूटच्या पद्धतीवर एक नवें एंजिनिअरिंग कॉलेज काढण्यांत येणार आहे. कॉलेजच्या स्थापनेसाठी ८० लाख रुपये खर्च येईल आणि त्यांत दरवर्षी ६० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यांत येईल.

**अरब राष्ट्रांना रशिआचें साह्य**—अरब राष्ट्रांना आर्थिक साह्य देण्यास रशिआ तयार असल्याचें कैरोमधील रशिअन वकिलानें जाहीर केलें आहे. अरब राष्ट्रांशीं राजकीय व सांस्कृतिक संबंध वाढविण्याची रशिआची इच्छा व्यक्त करून, इजिप्तच्या आर्थिक विकासाच्या योजनांना मदत करण्याची तयारीहि त्यानें आपल्या देशातर्फें व्यक्त केली.

**"असा धर्म आम्हीं मानूं"**—भारताचे उपराष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् हे रशिआंत वकील म्हणून काम करीत असतां त्यांनीं लेनिनग्रॅड विद्यापीठांतील बऱ्याच विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांनां त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन धर्माचें महत्त्व पटवून दिलें. धर्म म्हणजे सत्य, सौजन्य आणि सौंदर्य ह्यांची आराधना, ही त्यांनीं केलेली व्याख्या त्यांच्या रशिअन श्रोत्यांनीं मान्य केली.

**सहकारी सोसायट्यांना कर्ज**—कच्छमधील सहकारी संस्थांना कर्जे देण्यासाठी म्हणून भारतीय सरकारनें ७,७०,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. ह्या रकमेपैकी २,७०,००० रु. एवढी रक्कम शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांना कर्जे देण्यासाठी उपयोगांत आणली जाणार आहे.

**पगाराच्या कायद्याची व्याप्ति**—पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टचें अंमलबजावणीचें क्षेत्र वाढविण्यासाठी भारतीय सरकार कायद्यांत दुरुस्ती करणार आहे, असें समजतें. सध्यां कारखाने, रेल्वे, खाणी व मळे ह्यांना तो लागू आहे. बांधकामाच्या धंद्यांतील मजूर आणि मोटारींनें मालाची वहातूक करण्याच्या धंद्यांतील कामगार ह्यांनाहि तो लागू करण्याचा सरकारचा मानस आहे.

**अहमदाबादला दुधाचा पुरवठा**—अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशन खैरा डिस्ट्रिक्ट को-आपरेटिव्ह मिल्क प्रोड्युसिंग युनिअन ह्या संस्थेकडून १८ रु. १२ आणे मणाप्रमाणें दूध खरेदी करण्याचा करार करणार आहे. अहमदाबाद शहराला दुधाचा पुरवठा करण्याच्या योजनेचा हा एक टप्पा आहे.

**कुटुंब-नियोजन केंद्रांसाठी रक्कम**—पंजाब राज्य सरकारनें आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत, दरवर्षी ५०,००० रुपयांची रक्कम कुटुंब-नियोजनाच्या चालू केंद्रांनां मदत करण्यासाठी आणि नवीन केंद्रें स्थापन करण्यासाठी मंजूर केली आहे.

**सांगलींतील विणकरांच्या सहकारी संस्था**—मुंबई सरकारनें राज्यांतील विणकरांच्या सहकारी संस्थांना २० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे. ह्या रकमेपैकीं २६,३५० रुपयांची रक्कम सांगली भागांतील सहकारी संस्थांना देण्यांत येणार आहे. उत्तर सातारा जिल्ह्यांतील सहकारी संस्थांना ६९,९०० रुपये मदतीदाखल मिळणार आहेत.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

**कण आणि क्षण**
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)
लेखक : श्री. वा. काळे

मराठी — दुसरी आवृत्ति — पृ. सं. १६८ ★ किं. १॥ रु.
गुजराती — दुसरी आवृत्ति — तयार होत आहे.

म्युच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी!!


**दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.**

ह्यातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७
ह्यातीनंतरच्या विम्यास : ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई
शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेले
**किर्लोस्कर** बैलांनी व पॉवरवर चालणारे
**उसाचे चरक**
आपल्या पसंतीनुरूप आणि गरजेप्रमाणे योग्य चरकाची निवड करा.
• शरद • कोयना • वसंत
सविस्तर माहिती आजच मागवा.



किर्लोस्कर बंधु लि.
किर्लोस्करवाडी द. सातारा.

// अर्थ //

बुधवार, ता. १९ ऑक्टोबर, १९५५



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## कोलंबो मदत-योजना आणि भारताचें धोरण

कोलंबो मदत-योजनेच्या सल्लागार समितीची परिषद सिंगापूर येथें नुकतीच भरली होती. ह्या परिषदेला भारतातर्फे मध्यवर्ती सरकारचे पाणी पुरवठा व वीज-मंत्री श्री. गुलझारीलाल नंदा हे भारतीय प्रतिनिधी मंडळाचे पुढारी ह्या नात्यानें हजर राहिले होते. कोलंबो-योजना आणि भारताची औद्योगिक प्रगति ह्या विषयासंबंधी परिषदेंत भाषण करतांना ते म्हणाले कीं, नियंत्रित पद्धतीनें औद्योगिक प्रगति साधणें हें भारताचें ध्येय आहे. दीर्घ कालावधींत अमलांत आणावयाच्या औद्योगिक प्रगतीकडे व विकासाकडे तर भारताला लक्ष द्यावयाचें आहेच; पण तें साध्य करीत असतांनाच छोट्या उद्योगधंद्यांची व ग्रामोद्योगांचीहि वाढ करावयाची आहे. ह्या धोरणामागें दोन कारणें आहेत:. देशाचें द्रुत गतीनें औद्योगिकरण घडवून आणण्यासाठी जरूर तितकें भांडवल आज उपलब्ध नाहीं. दुसरें कारण असें कीं वाढत्या लोकसंख्येचा विचार करतां अधिकाधिक लोकांना रोजगार मिळवून देणें जरूर आहे. ग्रामोद्योगांची जरूरी राहिलेली नाहीं अशी परिस्थिति प्राप्त होण्यास अजून कितीतरी पंचवार्षिक योजना अंमलांत आणाव्या लागतील. दरम्यानच्या काळांत ग्रामोद्योगांचा फायदा घेऊन भारताला आपला निर्यात-व्यापार वाढवितां येईल. उदाहरणार्थ, खेड्यांत सुती कापडाचें उत्पादन भरपूर प्रमाणांत झालें तर त्यामुळें स्थानिक गरजा जागच्या जागींच भागतील. त्यामुळें कापडाच्या गिरण्यांतून उत्पादन करण्यांत येणारें कापड अधिक प्रमाणांत निर्यात करतां येणें शक्य होईल. आजाहि भारत कापसाचें कापड निर्यात करीत आहे. कापड निर्यात करणारे जे देश आहेत, त्यांच्यांत भारताचा अनुक्रम हळुहळु वर लागत चालला आहे. जी गोष्ट कापडाच्या धंद्या-बाबत खरी आहे तीच गोष्ट इतर ग्रामोद्योगांनाहि लागू आहे.

## भारताचा चित्रपटाचा धंदा

फिल्म फेडरेशन ऑफ इंडिआ ह्या संस्थेचे अध्यक्ष श्री. वासन ह्यांनीं चित्रपटविषयक पत्रपंडितासमोर भाषण केलें. पत्रपंडितांनीं चित्रपटांचें मार्मिक व योग्य परीक्षण करण्याचें कार्य केल्यामुळें ह्या धंद्याची वाढ होण्यास मदत झाली, असे उद्गार त्यांनीं काढले. चित्रपटाच्या धंद्यासंबंधी बोलतांना ते म्हणाले कीं, गेल्या ४० वर्षांत ह्या धंद्याचा व्याप खूपच वाढला आहे. चित्रपट निर्माण करण्यांत भारताचा जगांतील देशांत दुसरा क्रमांक होता. पण आतां दुसरी जागा जपाननें घेतलेली आहे. तथापि, ह्यांत घाबरण्यासारखें कांहीं नाहीं. भारताची संस्कृति व परंपरा ह्यांचा विचार करतां भारताला दुसरेंच काय पण पहिलें स्थानहि मिळवितां येणें अशक्य नाहीं. सरकार व लोक ह्यांच्याकडून फारसें उत्तेजन मिळत नसतां आणि योग्य उपकरणांची वाण असतांनासुद्धां, जगभर कौतुक होईल अशा प्रकारचे चित्रपट भारतांत तयार झालेले आहेत. ह्या धंद्याच्या मार्गांत बऱ्याच अडचणी आहेत. करमणुकीवरील कर ही त्यापैकीं एक आहे. ह्या कराच्या रूपानें चित्रपटाचा धंदा सरकारला दरवर्षी १२ कोटी रुपयांचें उत्पन्न देत आहे. निर्मात्यांच्या उत्पन्नापैकीं फार मोठा भाग भारी कराच्या रूपानें त्यांच्याकडून घेतला जातो. सोन्याचीं अंडीं देणाऱ्या कोंबडीला मारण्यापैकीच हा प्रकार आहे. करमणूक करापैकीं कांहीं रक्कम जर भांडवलाच्या रूपानें परत ह्या धंद्यांत गुंतविण्यांत आली तर भारत चित्रपटाच्या धंद्यांत जगांतील पहिला देश होईल. चित्रपटाच्या धंद्याचें एक विवक्षित अर्थशास्त्र आहे. त्यामुळें व सरकारी मदतीच्या व उत्तेजनाच्या अभावीं, ९० टक्के निर्मात्यांना फार मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करावा लागतो. असें असून सुद्धां चित्रपटांच्या वार्षिक निर्मितींत फारशी घट झालेली नाहीं. कारण ह्या धंद्याच्या झगझगाटामुळें लोक त्याच्याकडे आकर्षित केले जात आहेत.

## मध्यपूर्वेत पाय रोवण्याचा रशिआचा प्रयत्न

झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारनें इजिप्तला शस्त्रास्त्रें पुरविण्याचा करार केल्यामुळें मध्यपूर्वेतील देशांत नवी परिस्थिति निर्माण होऊं पहात आहे. इजिप्तशिवाय इतर कांहीं अरब राष्ट्रांना शस्त्रें व आर्थिक मदत देण्याची तयारी रशिआनें दाखविली आहे. नाइल नदीवर आस्वान ह्या ठिकाणीं एक मोठें धरण बांधून वीज निर्माण करण्याची योजना इजिप्तनें आंखलेली आहे. ह्या प्रचंड धरणासाठी ८.९ कोटी पौंड खर्च येणार असून ती सर्व रक्कम रशियानें देऊं केली आहे, अशी वार्ता आहे. इजिप्तचें औद्योगीकरण करण्याच्या ज्या योजना कर्नल नासर ह्यांच्या सरकारनें आंखल्या आहेत, त्यांत आस्वान येथील धरणाला फार महत्त्वाचें स्थान आहे. इजिप्तमधील जुनाट दारिद्र्याचा रोग औद्योगीकरणाशिवाय बरा होण्यासारखा नाहीं. धरणासाठीं जरूर तें भांडवल मिळावें म्हणून इजिप्तचें सरकार गेलीं दोन वर्षें अमेरिकन सरकारशीं आणि जागतिक बँकेशीं वाटाघाटी करीत आहे. पण अजून पर्यंत त्या यशस्वी झालेल्या नाहींत. रशिआनें देऊं केलेलें कर्ज उदार अटीवर मिळणार आहे. कर्जाची फेड ३० वर्षांत करावयाची असून तीहि कापूस व तांदूळ ह्यांच्या रूपानें केली तरी चालण्यासारखें आहे. ह्या सर्व घडामोडींचा अर्थ, अमेरिकेनें जरूर तितकें कर्ज दिल्यास इजिप्त तें घेणार नाहीं असें नाहीं. पण रशिआची मदतहि झिडकारण्यांत येणार नाहीं. इजिप्तचे अमेरिकेंतील वकील मि. अहमद हुसेन ह्यांनीं आपल्या देशाची भूमिका वरीलप्रमाणें स्पष्ट केली आहे. इजिप्तप्रमाणेंच येमेन आणि सीरिया ह्या देशांबरोबरहि मैत्रीचे व आर्थिक साह्याचे करार करण्याची बोलणीं रशिया करीत आहे.

### "अर्था"चा दिवाळी अंक

"अर्था"चा ह्या पुढील अंक 'दिवाळी अंक' म्हणून प्रसिद्ध होईल. त्यापूर्वी अंक प्रसिद्ध होणार नाहीं.

## कारेगांव भाग सहकारी कारखाना लि., श्रीरामपूर
## ( जि. अहमदनगर )

**( चेअरमन: डॉ. र. गो. काकडे, एम. ए., एलएल. बी., पीएच्. डी.**
**व्हाइस चेअरमन: श्री. निवृत्ति नारायण बनकर पाटील, पढेगांव**
**ऑ. सुपरिंटेंडेंट: द. दि. तोतडे, बी. ए., एच. डी. सी. )**

श्रीरामपूर तालुक्यांत प्रवरा सहकारी साखरकारखाना स्थापन झाल्यापासून श्रीरामपूर तालुक्याच्या पूर्वभागांतहि तशा प्रकारचा कारखाना काढावा अशी इच्छा इकडील शेतकऱ्यांच्या मनांत बरेच दिवसांपासून घोळत होती. या भागांत जवळजवळ ५,००० एकरांहून जास्त असें उसाचें क्षेत्र आहे, पाण्याचा निश्चित असा पुरवठा असल्यानें ऊंस पिकवून त्यापासून गूळ तयार करण्याचा धंदा फारच मोठ्या प्रमाणावर या भागांत केला जातो. परंतु गुळाच्या भावाच्या चढउतारामुळें तो कधीं फायद्याचा, तर कधीं तोट्याचा ठरतो. ही अनिश्चितता टाळून शेतकऱ्यांच्या जीवनांत स्थैर्य निर्माण करावयाचें झाल्यास उसापासून साखर उत्पादन करणें आवश्यक आहे; ही गोष्ट शेजारच्या प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांकडे पाहून लोकांना पटली होती. सहकारी साखर कारखाना काढण्यास अशा रीतीनें अनुकूल वातावरण निर्माण झालें असतां महाराष्ट्रांत १२ सहकारी साखर कारखाने काढण्यास सरकारनें परवानगी व मदत देण्याचें जाहीर केलें. सरकारी धोरण जाहीर होतांच श्रीरामपूर येथें ता. २४।६।५४ रोजीं साखर कारखाना काढण्याचे दृष्टीनें पहिली सभा घेण्यांत आली व जरूर तें रु. ३ लाखांचें भांडवल १४।७।५४ पर्यंत जमवून सरकारकडे अर्ज देण्यांत आला. कारखाना दि. १।१२।५४ ला रीतसर रजिस्टर करण्यांत आला. दि. ८।१।५५ ला पहिली साधारण सभा होऊन कामकाजास रीतसर सुरुवात झाली. ता. १५।१।५५ ला भारत सरकारकडून कारखाना काढण्यास परवाना ( लायसेन्स ) हि मिळाला.

**ऊंसक्षेत्र:—** कारखान्याचे कार्यक्षेत्रांतील उसाचें क्षेत्र ५००० एकर असून पैकी ३३१५ एकर क्षेत्र कारखान्याचे शेअर्सपोटीं आतांपर्यंत रकमा भरणाऱ्या शेतकऱ्यांचें आहे. यापैकीं १६७५ एकर क्षेत्र असलेल्या २६१ बागाईतदारांना अहवालाचे सालांत, त्यांनीं रीतसर रक्कम भरून अर्ज केल्यावरून, सभासद करून घेतलेलें आहे. राहिलेल्या क्षेत्राच्या बागायतदारांकडून जरूर त्या अटींची चालू सालीं पूर्तता होऊन ते कारखान्याचे रीतसर सभासद होतील अशी आशा आहे.

**सभासद व भांडवल:—** कारखान्याचें भांडवल दि. ३०–६–१९५५ अखेर रु. ७,७१,५३१ जमलें असून त्यापैकीं रु. ४,६५,५२९ इतकें भांडवल सभासद करून घेतलेल्या शेतकऱ्यांचें आहे. बाकी रु. ३,०६,००२ इतर शेतकऱ्यांची अनामत रक्कम म्हणून जमा आहे. अनामत रक्कम भरलेल्या बागायतदारांनीं अद्याप शेअरमागें रु. २५० प्रमाणें रक्कम भरावयाची आहे, व त्याचा परिणाम साहजिकच भांडवल जमण्यावर होत आहे. कारखाना सुरू होण्याचे अगोदर रु. ३० लक्ष भांडवल उभारावयाचें आहे, व हें उद्दिष्ट लवकर साध्य होणें सर्व बागायतदारांच्या हार्दिक सहकार्यावर अवलंबून आहे.

अहवालाचे मुदतींत दिल्लीच्या इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशनकडे कर्जासाठीं व मुंबई सरकारकडे भाग–भांडवलासाठी अर्ज करण्यांत आले आहेत. ( अहवालाचे मुदतीनंतर इं. फा. कॉ. चे रु. ४५ लाखांचें कर्ज मंजूर झालें असून तें कारखान्यानें रु. ३० लक्ष जमा केल्यावर मिळावयाचें आहे. )

**मशिनरी:—** कारखान्याचें सामील क्षेत्र विचारांत घेतां रोज १००० ते १२०० टन ऊंस गाळील एवढी मोठी मशिनरी आवश्यक आहे. मुंबई सरकारच्या शिफारसीप्रमाणें लवकरच मशिनरीची ऑर्डर देण्यांत येणार आहे.

## प्रपोज्ड श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना कोऱ्हाळे बु ॥
## ( ता. बारामती, जि. पुणें )

**[ चेअरमन: श्री. नानासाहेब बापूजी जगताप**
**व्हा. चेअरमन: दिनकरराव यमाजीराव राजे निंबाळकर**
**ऑ. सेक्रेटरी: मुगुटराव साहेबराव काकडे ( देशमुख ) ]**

सरकारनें सहकारी तत्त्वावर साखर कारखाने काढण्याचें धोरण ठरविलें, त्यावेळीं आपले सरकारनें कोऱ्हाळे बु॥ येथील साखर कारखान्याचें नांव जाहीर केलेलें आहेच. साखर कारखान्याचा फाटा नं. २ ते १८ या कार्यक्षेत्रांत सध्यां उभा असलेला ( पिकत असलेला ) ऊंस २७०० एकर आहे. याशिवाय सुमारें ५०० एकर ऊंस या क्षेत्रांत वाढविण्यास पूर्ण वाव आहे व ते वाढण्याची शक्यताहि आहे.

१८ फाट्यावरील अंदाजें ५०० एकर ऊंस व वाढ होण्याची शक्यता असलेला सुमारें ५०० एकर ऊंस, एकूण १,००० एकर ऊस या क्षेत्राबाबतचा विचार तूर्त बाजूला ठेवला तरी ह्या कार्यक्षेत्रांत सदर वरील ऊंस पिकाशिवाय सुमारें २,२०० एकर ऊंस उभा आहे व ते सर्व ऊंस बागायतदार सभासद होत आहेत. कोणत्याहि सहकारी कारखान्यापेक्षा हा सहकारी साखर कारखाना स्मॉल होल्डर शेतकऱ्यांचा आहे हें दिसून येईल.

नजिकचे माळेगांव सहकारी साखर कारखाना व सणसर सहकारी साखर कारखाना हे दोन्ही साखर कारखाने रजिस्टर झाले आहेत. माळेगांव सहकारी साखर कारखान्याचें सुमारें ८,२५,००० रुपये शेअर भांडवल जमलेलें असून सरकारी जरूर ते लायसेन्स मिळालें आहे व कारखान्याकरितां माशिनरी विकत घेणेचें काम चालूं आहे. तसेंच सणसर सहकारी कारखान्याचे सुमारें ५,२५००० रुपये शेअर भांडवल जमा झाले आहे व जरूर ते लायसेन्स मिळविण्याचें काम चालूं आहे. ह्या सिझनमध्यें एकूण ८ लाख रुपये शेअर भांडवलाची पूर्तता करण्याचा निश्चय सदर कारखान्याचे प्रमोटर्सनीं केला आहे व त्याप्रमाणें ते जमा होईल अशी खात्री आहे. हे दोन्ही साखर कारखाने सन १९५६–५७ सालांत, म्हणजे पुढील वर्षाच्या हंगामांत आपल्या उसाची साखर स्व-मालकीच्या कारखान्यांत तयार करतील अशी आतां पूर्ण खात्री झाली आहे. माळेगांव सहकारी साखर कारखान्याचे नेते कै. दादासाहेब शेंबेकर यांनीं माळेगांव सहकारी साखर कारखान्याचे भांडवली व दप्तरी काम कोठल्याहि स्थितींत अपुरें न ठेवतां पूर्णावस्थेंत ठेवलें आहे. फक्त कारखाना उभारून उसाची साखर तयार करणें एवढें काम करून आत्म्यास समाधान मिळणें, एवढा अवसर त्यांना मिळाला नाहीं.

कै. दादासाहेब शेंबेकर यांच्याच नेतृत्वाखाली सणसर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष श्री. साहेबराव नामदेवराव जाचक व श्री. बाबुराव बुवासाहेब राजे भोसले ऑ. सेक्रेटरी यांनीं तळमळीनें कार्य केलेलें आहे व आज तें बरेच प्रगतिपदावर आलेलें आहे.

या सहकारी साखर कारखान्याचे कार्यक्षेत्रांतील सर्व ऊंसवाले शेतकऱ्यांनीं यावेळीं लौकरच सभासद झाले पाहिजे म्हणजे सन १९५५–५६ पर्यंत ५ ते ५॥ लाख रुपये शेअर भांडवल जमा झाल्यावर ६०० ते ८०० टनांचा साखर कारखाना उभारतां येतो. हा साखर कारखाना उभारला जावून सन १९५६–५७ सालांत उसाची साखर तयार करितां येईल. परंतु त्याहीपेक्षा हें काम अगोदर व्हावें असे विचार व प्रयत्न आहेत.

## भारतांतील प्रवासी व्यवसाय

### विकासासाठी सरकारचे प्रयत्न

परकीय हुंडणावळ मिळविण्याच्या दृष्टीनें एक प्रमुख धंदा म्हणून प्रवास व्यवसायाचा विकास साधण्याची गरज महायुद्धानंतर प्रथमच भासूं लागली. युद्धोत्तर कालांत म्हणजे १९४५-४९ या वर्षांत पश्चिम युरोपीय देशांची आर्थिक घडी उध्वस्त झाल्यानें व प्रवासी व्यवसाय हेंच डॉलर मिळविण्याचें एक अत्यंत महत्त्वाचें साधन झाल्यामुळें त्या देशांनींच या प्रवासी व्यवसायांत पुढाकार घेतला. १९५२ मध्यें पश्चिम युरोपांतील १६ देशांनीं मिळून चालविलेल्या युरोपियन ट्रॅव्हल कमिशननें अमेरिकन प्रवाशांकडून दुसऱ्या कोठल्याहि धंद्यापेक्षाहि अधिक डॉलर या धंद्याद्वारें मिळविले. या व्यवसायाचें स्वरूप किती अवाढव्य होतें याची कल्पना पुढील आंकडेवारीवरून येईल.

| देश | प्रवाशांची संख्या | हॉटेलांतून राहाणारे प्रवासी | परकीय हुंडणावळीची मिळकत ( कोटी पौंड ) |
|---|---|---|---|
| इटली | ५४,०५,८६२ | ४,६१,८१९ | २४·६ |
| स्वित्झर्लंड | ५३,३०,१५५ | १,८०,६०० | १६·६ |
| फ्रान्स | ३१,९१,००० | ११,३६,००० | १३·३ |
| इंग्लंड | ७,२३,९५४ | १५,८८,००० | २२·३ |

भारतानें ह्या धंद्याच्या विकासासाठी प्रयत्न केले ते असे :—

भारतांत प्रवासी व्यवसायाच्या विकासाची शक्याशक्यता पाहण्याकरितां भारत सरकारनें १९४५ मध्यें सर जॉन सार्जंट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति स्थापिली.

डिसेंबर १९४९ मध्यें मध्यवर्ती वाहतूक खात्यानें एका छोट्या प्रवासी वाहतूक शाखेची स्थापना केली. तदनंतर तावडतोब मुंबई, दिल्ली, कलकत्ता व मद्रास या शहरीं चार प्रादेशिक प्रवासी कचेऱ्यांची स्थापना करण्यांत आली. परदेशांतील प्रवाशांस या देशांत प्रवास करण्यासंबंधीं आकर्षण व आवड निर्माण करणें हें ऑफिशिअल टुरिस्ट ऑर्गनायझेशनचें मुख्य काम होतें. बहुतेक सर्व युरोपिअन देशांच्या तसेंच, जपान, इजिप्त, सिलोन, तुर्कस्तान या देशांचाहि या बाबतींत हाच दृष्टिकोन होता. म्हणून परदेशांतहि अशा प्रवासी कचेऱ्या स्थापण्याचें ठरलें. तदनुसार डिसेंबर १९५२ मध्यें न्यूयॉर्क येथें पहिली कचेरी स्थापण्यांत आली. नुकतीच सानफ्रान्सिस्को व लंडन येथें एकेक कचेरी उघडण्यांत आली आहे. फ्रान्स, प. जर्मनी, स्कँडेनेव्हिया, अर्जेंटिना, सीलोन व ऑस्ट्रेलिया या देशांतहि अशा कचेऱ्या उघडण्याचा विचार आहे.

### प्रवासी व्यवसायाचा विकास

बहुतेक सर्व देशांतील सरकारी प्रवासी संघटनांस प्रवासी व्यवसायाची प्रसिद्धि करणें, धोरण आंखणें व कार्यक्रमांत एकसूत्रता आणणें, हीं कामें प्रामुख्यानें करावीं लागतात. प्रवासी एकदां देशांत आल्यावर पुढील सर्व व्यवस्था स्थानिक अधिकारी व खाजगी संघटना करतात. भारतांत हा व्यवसाय नवीन असल्यानें त्याच्या विकासासाठी प्रमुख प्रवासी केंद्रांवर प्रवासी माहिती कचेऱ्या उघडाव्या लागल्या. भारतांत आतां मुंबई, दिल्ली, कलकत्ता, मद्रास या शहरीं प्रादेशिक कचेऱ्या आहेत. तर श्रीनगर, आग्रा, बनारस, जयपूर, औरंगाबाद, बंगलूर, दार्जिलिंग, सिमला व उटकमंड या शहरीं माहिती कचेऱ्या उघडण्यांत आल्या आहेत.

सेवा, सुरक्षा आणि सौजन्याचें प्रतीक
स्थापना १९१८
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,३६,०००
रिझर्व रु. ६,४६,०००
ठेवी रु. १,३७,००,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
शाखा : दादर, माहीम, बेळगांव, पुणें
हमाम स्ट्रीट येथें बँकेची फोर्ट शाखा २३ जूनपासून चालू झाली आहे.

इटली व इंग्लंड यांसारख्या लहान देशांस या व्यवसायांत प्रचंड परकीय हुंडणावळ मिळते. १९५१ ते १९५४ च्या दरम्यान भारतांतील प्रवासी वाहतूक व्यवस्थेंत १०० टक्के वाढ झाली असली तरी इतर देशांशीं तुलना करतां प्रत्यक्ष होणारें उत्पन्न अत्यल्पच आहे. यासाठी परकीय प्रवासी वाहतूक व्यवस्थेच्या विकासावरोबरच देशांतील प्रवासी वाहतूक व्यवस्थेचाहि विकास होणें आवश्यक आहे.

### सुखसोईंचें नियोजन

या देशांतील अनेक प्रवासी केंद्रांवर दळणवळण, वाहतूक व निवासस्थानें यासारख्या अत्यावश्यक सोईंची पाहिजे तशी व्यवस्था नाहीं. तसेंच करमणुकीची व वस्तुखरेदीची व्यवस्था झाली पाहिजे. तथापि आपला मुख्य भर रस्ते व विश्रामगृहें यांवरच असल्यानें इतर सुखसोयींसाठी फारच कमी पैसा खर्च करतां येईल. त्याशिवाय आपणांस कामगार, विद्यार्थी, यांसारख्या कमी उत्पन्न असणाऱ्या प्रवाशांचाहि विचार करणें जरूर आहे. यासाठी मध्यवर्ती वाहतूक खात्यानें स्वस्त विश्रांतिगृहांची योजना आंखली आहे.

दळणवळणाचीं साधनें हीं प्रवासी व्यवस्थेच्या विकासांतील प्राथमिक बाब होय. तदनंतर विश्रामगृहें. पूर्वी दौऱ्यावर जाणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांसाठी विश्रामगृहांचा वापर होई. परंतु आतां तीं सर्व प्रवाशांसाठी खुलीं असून त्यांचा त्यांस फार उपयोग होत आहे. परदेशांतून आलेल्या प्रवाशांना सरकारी नोकराआधीं आश्रय देण्याची आतां विश्रामगृहांतून सोय करण्यांत आली आहे. सरकार अशा आणखी कांहीं विश्रामगृहांची व्यवस्था करीत आहे. पुढील वर्षी बुद्धधर्मीयांचे कांहीं समारंभ असल्यामुळें अशा केंद्रांवर पुढील वर्षी बरेच लोक येण्याचा संभव आहे. त्यांची व्यवस्था करण्यासाठी सरकारनें अशीं विश्रामगृहें उघडण्याच्या दिशेनें पाऊल टाकलें आहे. या विश्रामगृहांत सर्व तऱ्हेची आधुनिक व्यवस्था करण्याची आवश्यकता सरकारला पटली आहे.

प्रवासी धंद्याचा विकास हा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम असून देशाची आर्थिक घडी सुव्यवस्थित करण्याच्या कामीं त्याचा मोठा फायदा होईल यांत शंका नाहीं.

## महत्त्वाच्या उद्योगधंद्यांतील वाढतें उत्पादन

| जिन्नस | परिमाण | प्रत्यक्ष उत्पादन | | |
|---|---|---|---|---|
| | | १९५३ | १९५४ | जाने–जून १९५५ |
| फ्लोरेसेंट दिवे | नग | १,०२,००० | २,१४,८०० | १,२७,५०० |
| पॉवर ट्रॅन्सफॉर्मर्स | केव्हीए | ३,०८,४०० | ३,९८,३४४ | २,५२,८०० |
| हाऊस सर्व्हिस मीटर्स | नग | ८०,६७६ | १,४८,८८४ | १,०९,६२३ |
| घरगुती वापरायचे रेफ्रिजरेटर्स | ,, | १,१४० | १,००८ | ३७५ |
| अल्युमिनियम | टन | ३,७५८·४ | ४,८८६ | ३,४४०·९ |
| तांबें | ,, | ४,९२० | ७,१६१ | ३,५१० |
| डिझेल अिंजिनें | नग | ३,७२० | ८,६५४ | ४,९९९ |
| मशिन टूल्स | हजार रु. किंमत | ४,४०७ | ५,००० | ३,००६ |
| रेशर्ची पार्ती | संख्या दशलक्षांत | २३·१६ | ११९·३८ | ९३·२५ |
| मोटारी | नग | | १४,४६२ | ११,००२ |
| | (अ) कार | ४,९३२ | | |
| | (आ) गाड्या | ८,९८८ | | |
| संपूर्ण सायकली | संख्या हजारांत | २६४·२ | ३७२·४ | २१०·० |
| सायकलींचे सुटे भाग व इतर अनुषंगिक सामग्री | किंमत कोटी रु. त | ०·१ | ०·१३ | ०·०७२ |
| हरिकेन कंदील | नग हजारांत | ४,३१२ | ४,९८७ | २,२९१ |
| शिवण्याचीं यंत्रें | ,, ,, | ६२·४ | ८०·२ | ४६·५ |
| सुती कापड | दशलक्ष वार | ४,८९१ | ४,९९८ | २,५१० |
| साबण | टन (हजारांत) | ८०·१ | ८८ | ३९·३ |
| कागद व पुट्टा | ,, ,, | १३८·४ | १५५·३ | ८२·४ |
| पादत्राणाचे देशी प्रकार | जोड्या (हजारांत) | २२·०४ | २·०६२ | १,१४२ |
| पेंट | टन | ३२,०५२ | ३५,९५६ | १५,३२८ |
| रबरी पादत्राणें | जोड्या (हजारांत) | २४,००० | ३१,२०० | १६,६०० |
| साखर | टन (हजारांत) | १,२९१ | १,००८ | १,४६९ |
| | | (१९५२–५३) | (१९५३–५४) | (नोव्हें. १९५४) (एप्रिल १९५५) |
| मीठ | मण (,,) | ८६,३१६ | ७३,९०८ | ६३,६०९ |
| पोलाद (तयार) | टन (,,) | १,०१७ | १,२३४ | ६३३ |
| सिमेंट | टन (दशलक्षांत) | ३·७८ | ४·४ | २·२१ |
| कोळसा | ,, ,, | ३५·८ | ३६·८ | १९·२ |

**शस्त्रास्त्रांच्या खरेदीला मदत**—सोव्हिएट रशिआकडून शस्त्रास्त्रें विकत घेण्यासाठी इजिप्तमध्यें फंड जमविण्यांत येत आहे. ह्या फंडाला मदत म्हणून आगाखान ह्यांनीं इजिप्तचे पंतप्रधान कर्नल नासर ह्यांच्याकडे १,००० पौंड धाडले आहेत. आगाखान ह्यांच्या चिरंजीवानेंहि ५०० पौंड धाडले आहेत.

**मद्रास शहरांतील रिक्षा**—मद्रास शहरांत माणसाकडून ओढण्यांत येणाऱ्या रिक्षा बंद करण्यांत येणार आहेत. अशा वाहनांना आतां नव्याने परवाने देण्यांत येणार नाहींत. शहरांत सुमारें ३,७५०: रिक्षावाले आहेत. रिक्षा ओढणाऱ्यांची मधून मधून वैद्यकीय परीक्षा करण्यांत येणार आहे. ह्या रिक्षांच्या ऐवजीं ऑटोरिक्षा सुरू करण्यासंबंधी सरकार विचार करीत आहे.

## वेस्टर्न इंडिया विमा कं. लि.

### पुणें शाखेच्या प्रतिनिधींची सभा

वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कं. लि. चे पुणें शाखेतील प्रतिनिधी मंडळींची सभा रविवार ता. २३–१०–५५ रोजीं दुपारीं ४॥ वाजतां कंपनीचे पुणें येथील इमारतींत झाली. सदर सभेचें विशेष म्हणजे अध्यक्षस्थान, कंपनीचेच पुणें शाखेचे प्रथितयश व विक्रयपटु प्रतिनिधी श्री. हरिभाऊ जोशी, बी. एससी. यांनीं स्वीकारलें होतें.

सदर सभेस स्थानिक व परगांवचे मिळून सुमारें १५० प्रतिनिधी हजर होते. सुरवातीस श्री. शामराव जोशी ऑर्गनायझर यांनीं अध्यक्षांची ओळख करून दिल्यानंतर कंपनीचे शाखाधिकारी श्री. कृ. ग. खांडेकर एम्. ए. यांनीं गुदस्त सालचे कामकाजाचा आढावा घेऊन, प्रतिनिधी मंडळींना अधिकाधिक विमाकाम मिळविण्यास उपयुक्त अशी, प्राप्तीकर, एस्टेट ड्यूटी ॲक्ट, कंपनीनें नवीन काढलेल्या योजना–सोयी–सवलती, इत्यादि बावत उद्बोधक माहिती निवेदन केली. तदनंतर श्री. पटवर्धन, श्री. काणे, श्री. वर्तक, श्री. मराठे, इत्यादि सन्मान्य प्रतिनिधींचीं भाषणें झालीं व त्यांनीं स्वतःचे विमा व्यवसायांतील अनुभव सांगून, ऑफिसकडून सर्व प्रकारें साहाय्य होत असल्याबद्दल सांगितलें. तदनंतर गुदस्तसालीं चांगलें काम करणाऱ्या प्रतिनिधी मंडळींना अध्यक्षांचे हस्तें पारितोषक वितरण–समारंभ झाला.

### अध्यक्ष, श्री. हरीभाऊ जोशी, ह्यांचें भाषण व बक्षिसें

अध्यक्षीय व समारोपाचें भाषण करतांना श्री. हरीभाऊ जोशी यांनीं स्वतःचे अनुभव सांगून प्रचलित अशा, विमा व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण, वारसा, कमिशन इत्यादि बाबींचा ऊहापोह केला. तसेंच सदर सभेचे प्रसंगीं आपली अध्यक्ष म्हणून योजना केलेबद्दल शाखाधिकाऱ्यांचे आभार मानले. या प्रसंगीं, १९५५ सालीं सबंध वर्षांत पुणें शाखा व मुंबई शाखा अशा दोन निरनिराळ्या गटांत, प्रत्येकीं जास्तींत जास्त पूर्ण काम करणाऱ्या, पहिल्या व दुसऱ्या नंबरच्या आपल्या कंपनीच्या प्रतिनिधींना स्वतःचे वैयक्तिक खर्चानें अनुक्रमें रु. १२५ व रु. ७५ याप्रमाणें आपले वडील व मातोश्री यांचे नांवानें बक्षिसें जाहीर केलीं.

आभारप्रदर्शनानंतर, वंदेमातरम् व नंतर अल्पोपहार होऊन हा गोड कार्यक्रम संपला.

### भोर स्टेट बँकेचा इमारत–प्रवेशारंभ

भोर स्टेट बँक, लि. च्या भोर येथील स्वतःच्या इमारतीचा प्रवेशारंभ व इतर धार्मिक विधि अश्विन शु॥ १० विजयादशमीचे (बुधवार दि. २६-१०-५५) सुमुहूर्तावर प्रातःकाळीं होणार आहे. त्यानिमित्त सदर दिवशीं ४ ते ५-३० पर्यंत पानसुपारी करण्यांत येईल.

**हिंवतापाविरुद्ध मोहीम**—सिन्नर नगरपालिकेनें हिंवतापाविरुद्ध उपाययोजना करण्यासाठी कर बसविण्याचें ठरविलें आहे. ह्या करांच्या रूपानें म्युनिसिपालिटीला १,५०० रुपयांचें उत्पन्न होईल. राज्य सरकारच्या हिंवतापविरोधी पथकाकडून वर्षांतून दोनदां आपल्या हद्दींत डी. डी. टी. चे फवारे मारून घेण्याचें नगरपालिकेनें ठरविलें आहे.

## भारतांतील इनूकमटॅक्स

| वार्षिक प्राप्ति (रु.) | कर देणारे नागरीक | % | कराची रक्कम (लक्ष रु.) | % |
|---|---|---|---|---|
| ३,६०१– ५,००० | १,२३,८०३ | ३२.९ | १,४२ | २.९ |
| ५,००१– ७,२०० | ९९,२३९ | २६.४ | २,४५ | ४.९ |
| ७,२०१–१०,००० | ५७,३८७ | १५.३ | २,९० | ५.९ |
| १०,००१–१२,५०० | २७,५९२ | ७.३ | २,३८ | ४.८ |
| १२,५०१–१५,००० | १६,०९८ | ४.३ | २,१० | ४.२ |
| १५,५०१–२०,००० | १७,५६८ | ४.७ | ३,७१ | ७.५ |
| २०,००१–२५,००० | १०,०३३ | २.७ | ३,४३ | ६.९ |
| २५,००० वर | २३,९५३ | ६.४ | ३१,२१ | ६२.९ |
| एकूण | ३,७५,६७३ | १००.० | ४९,६० | १००.० |

## सुपरटॅक्स

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५,००१– ४०,००० | १६,०९४ | ५६.७ | १,७२ | ६.३ |
| ४०,००१– ५५,००० | ५,५३४ | १९.५ | २,३३ | ८.५ |
| ५५,००१– ७०,००० | २,३८३ | ८.४ | २,०४ | ७.५ |
| ७०,००१– ८५,००० | १,४१५ | ५.० | २,०७ | ७.६ |
| ८५,००१– १,००,००० | ७८७ | २.८ | १,६५ | ६.० |
| १,००,००१–१,५०,००० | १,१८३ | ४.२ | ४,१० | १५.० |
| ५०,००१– २,००,००० | ४२० | १.५ | २,४५ | ९.० |
| २,००,००१– वर | ५५० | १.९ | १०,९० | ४०.० |
| एकूण | २८,३६६ | १००.० | २७,२६ | १००.० |

### ओखा येथील मालडब्यांचा कारखाना

सौराष्ट्रांतील ओखा ह्या बंदरांत अरुंद रुळावर वापरण्यांत येणाऱ्या मालवाहू रेल्वेच्या डब्यांचा कारखाना आहे. कारखान्यांत मालाच्या डब्यांची जुळणी करण्यांत येते. रेल्वे–बोर्डानें ह्या कारखान्याचा विस्तार करण्याची एक योजना मंजूर केली आहे. माल डब्यांची जुळणी करण्याची कारखान्याची क्षमता सध्यांच्या मानानें दुप्पट करण्याचा आराखडा योजनेंत समाविष्ट करण्यांत आला आहे. सध्यां कारखान्यांत दररोज १६ ते २० मालवाहू डबे जुळवून तयार करण्यांत येतात. नवी योजना मूर्तस्वरूपांत आल्यावर ह्याच ठिकाणीं रोज सुमारें ४० डबे तयार करणें शक्य होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे. कारखान्याची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी तेथें अधिक यंत्रसामुग्रीची सोय करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी ५,४०,००० रुपयांचा भांडवली खर्च करण्याची तयारी रेल्वे–बोर्डानें केली आहे. अमेरिका व इतर कांहीं परकीय देश ह्यांच्याकडून भारताला जी तांत्रिक मदत मिळणार आहे, तींत अरुंद रुळावर धावणाऱ्या मालवाहू डब्यांचा समावेश आहे. परंतु हे डबे सुट्या भागांच्या स्वरूपांत भारतांत येतात व नंतर त्यांची जुळणी करावी लागते. १९५६–५७ ह्या सालीं परदेशांकडून असे सुटे डबे मोठ्या प्रमाणावर येणार आहेत. त्यांची जुळणी त्वरेनें करण्यासाठी ओखा येथील कारखान्याचा विस्तार करण्यांत येत आहे. चालू वर्षाच्या डिसेंबरअखेर ओखा येथील कारखान्यांत १,६०० नव्या डब्यांची जुळणी करण्यांत येईल. पुढील वर्षाच्या फेब्रुवारी ते ऑक्टोबर ह्या काळांत मात्र कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या डब्यांची संख्या खूपच वाढेल. ऑक्टोबरअखेर ८,५४० नवे डबे तयार करण्यांत येतील. दरमहा सुमारें १,००० डबे कारखान्यांत जुळविण्यांत येतील.

विमान, आगबोट, रेल्वे, मोटार, आदि वाहनानें केलेले विविध प्रवास, यात्रा व क्षेत्रांचीं वर्णनें, प्रवासांत येणाऱ्या अडचणी, तक्रारी व त्यांचें निरसन यांवर सांगोपांग चर्चा करणारें

**प्रवासी–मासिक**

वा. व. म. ऑ. नें ३ रु. कोणत्याहि महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.
प्रवासी कार्यालय, ९२८ सदाशिव पेठ, पुणें २.

**अन्नाचें रहस्य**




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—गुलभाद, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

स्थापना १९३६
**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**
[ शेड्यूल्ड बँक ]
हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद
ता. ३१–१२–५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–११–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | २–०–० |
| चालू डिपॉझिट | „ | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.




## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिडयूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११९ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी–विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तुर, वगैरे शेतमालाची खरेदी–विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार–SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.